महाराष्ट्र वन विभाग
"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

महाराष्ट्र शासन
वनविभाग

**उप वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर**
**मु.पो.तालुका जुन्नर, दादोजी कोंडदेववाडा, जि. पुणे - 410502.**

दूरध्वनी क्र. 02132 222063
Email ID: junnarforestdn@gmail.com / dycfjunnar@mahaforest.gov.in

---

**क्रमांक-अ/कक्ष-४.२/जमीन/ 241 /२०२०-२१, दिनांक 20 /०१/२०२१**

**प्रती,**

**कार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,**
**वांद्रे रिक्लेमेशन बस स्थानक,**
**मुंबई (पश्चिम)-४०० ०५०.**

**विषय**: पुणे वर्तुळ मार्ग (पूर्व) बांधणेकामी वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत वनजमीन मागणीचा प्रस्ताव....

**संदर्भ**:
१) आपलेकडील क्र. FP/MH/ROAD/76881/2020 चा ऑनलाईन प्रस्ताव.
२) आपलेकडील क्र. FP/MH/ROAD/114977/2020 चा ऑनलाईन प्रस्ताव.
३) आपलेकडील क्र. FP/MH/ROAD/22819/2020 चा ऑनलाईन प्रस्ताव.

विषयांकित प्रकरणी शासनाचे वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत प्राप्त प्रस्तावाचे संदर्भातील शासकीय संकेत स्थळावर पुणे वर्तुळ मार्ग (पूर्व) बांधणेकामी वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत वनजमीन मागणीचे संदर्भीय प्रस्ताव उपवनसंरक्षक स्तरावर सादर केल्याचे निदर्शनास येत आहे. त्या अनुषंगाने आपले प्रतिनिधी यांना संपर्क केला असता त्यांनी प्रस्तावाची एक प्रत (Hard Copy) दिनांक १९/०१/२०२१ रोजी तपासण्यासाठी या कार्यालयास सादर केली आहे. सदर प्रस्तावाची पडताळणी केली असता काळजीपूर्वक न तपासता पाठविलेला असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

१) रस्त्यासाठी तपासलेल्या तीन आखणी नकाशे (Alternativ alignment) व त्यापैकी रद्द केलेल्या आखणी, रद्द करण्याच्या कारणासह प्रस्तावात जोडाव्यात.

२) प्रस्तावात प्रोजेक्ट नोट जोडलेली नाही ती जोडावी.

३) प्रस्तावात रस्त्याचा काटछेद (Cross section) जोडलेला नाही. तरी ते प्रस्तावात जोडावा.

४) प्रस्तावासाठी आवश्यक वनक्षेत्र हे कमीत कमी असलेबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचे प्रमाणपत्र प्रस्तावात जोडावे.

५) प्रस्तावित रस्त्याचे आखणींमध्ये पुरातन बांधकाम / एतिहासिक स्मारक/ संरक्षित क्षेत्र नसलेबाबत पुरातत्व विभागाचे प्रमाणपत्र तसेच आपले हमीपत्र प्रस्तावात जोडावे.

६) प्रस्तावित रस्त्यासाठी पर्यायी वनेत्तर जमीन उपलब्ध नसलेबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचे प्रमाणपत्र प्रस्तावात जोडावे.

७) वनहक्क कायदा २००६ अंतर्गत रस्त्यासाठी प्रस्तावित वनक्षेत्रावर कोणताही दावा दाखल नसलेबाबत संबंधित ग्रामसभेचा ठराव प्रस्तावात जोडावा.

८) प्रस्तावित रस्त्यासाठी बाधित होणा-या वनक्षेत्राचे बदल्यात वनेत्तर क्षेत्र उपलब्ध करून त्यांचे नकाशे व त्याची K.M.L फाईल प्रस्तावात सादर करावी.

९) क्षेत्रविवरण तक्त्यामध्ये रस्त्याची रुंदी नमूद करून सुधारित तक्ता सादर करावा.

१०) रस्त्याचे कामाची प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची प्रत प्रस्तावात जोडावी.

११) रस्त्यासाठी खाजगी जमिनी अधिग्रहण केलेबाबतची अधिसूचना प्रस्तावात जोडावी.

**(जयरामेगौडा आर)**
**उप वनसंरक्षक,**
**जुन्नर वनविभाग, जुन्नर**

**प्रत-** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केन्द्रस्थ), म.रा. नागपूर, यांना माहितीसाठी सादर.
**प्रत-** मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांना माहितीसाठी सादर.
**प्रत-** व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, वांद्रे रिक्लेमेशन बस स्थानक, मुंबई (पश्चिम)-४०० ०५०.
**प्रत-** उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
**प्रत-**सहाय्यक वनसंरक्षक (वनी), जुन्नर वनविभाग, जुन्नर यांना माहितीसाठी रवाना.
**प्रत-** वनपरिक्षेत्र अधिकारी, चाकण यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.